तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन हा मुद्दा स्थायी विषय म्हणून बैठकांच्या विषयसूचीमध्ये आणि क्षेत्रीय स्तरावरील निरीक्षण भेटीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५१/१६/आस्था-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ डिसेंबर, २०१७.

<u>**वाचा**</u>:- १) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक्र-सावVि-२०१६/प्र.क्र.१३१/ फ-११, दि. ३१.०३.२०१६.
२) शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक्र-साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि. १०.१०.२०१६.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक्र-साववि-२०१६/प्र.क्र.१६६/फ-११, दि. ०४.०१.२०१७.

<u>**प्रस्तावना:-**</u>

लहरी हवामान आणि ऋतूबदल, वाढते तापमान, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य या नैसर्गिक आपत्तींची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने हाती घेलेल्या “हरित महाराष्ट्र” या कार्यक्रमांतर्गत सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविले असून, सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. सन २०१८ आणि सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यंत लागवड केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तमरीतीने होणेसाठी सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील प्रत्येक तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांच्या विषयसूचीमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करण्यात यावा. यामध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, या पूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण, मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड, पुढील वर्षांमध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता, आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे विहित कालावधीमध्ये पिटस् तयार करणे, निधीची उपलब्धता इत्यादी संदर्भातील पूर्व तयारीबाबत आढावा घेण्यात यावा.

२. वृक्ष लागवड कार्यक्रमासंदर्भात झालेल्या निर्णयांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करण्यात यावी. तसेच इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या निर्णयासंदर्भात झालेल्या अंमलबजावणीबाबत आणि क्षेत्रीय अधिका-यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात संवेदनशील राहून त्यांच्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

३. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक नागरिकास सहभाग घेता यावा यासाठी वन विभागाने नेमून दिलेल्या दि.२०/१२/२०१७ च्या दिवशी क्षेत्रीय कार्यालयात खास कक्ष तयार करुन महाराष्ट्र हरित सेनेचे स्वयंसेवक म्हणून सदस्य नोंदणीची जबाबदारी कार्यालयातील २ ते ४ कर्मचा-यांना देण्यात यावी. आवश्यक तर याकामी वन विभागाच्या स्थानिक क्षेत्रीय कर्मचा-यांची मदत घेण्यात यावी. कार्यालयातील सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, मित्रपरिवार व नातेवाईक इत्यादीची हरित सेनेमध्ये प्राधान्याने नोंदणी करण्याबाबत कार्यवाही करावी. सदस्य

नोंदणीची वेग वाढविण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावेत. या कामात स्वयंप्रेरणेने व स्वयंस्फूर्तीने सहभागी होणा-या व्यक्ती/ संस्थांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रशस्तीपत्रक देण्यात येईल.

४. तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील जे अधिकारी क्षेत्रीय कामांना भेटी देतील, त्यावेळी त्या त्या कार्यालयांतर्गत वृक्ष लागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. अशा भेटीच्या वेळी कार्यालयांतर्गत लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्यरितीने होते किंवा नाही, मृत झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली किंवा नाही, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इत्यादी बाबींची तसेच प्रस्तावित वृक्ष लागवडीसाठी निवडलेली स्थळे, आवश्यक त्या परिमाणाचे पिटस् विहित वेळेत तयार करणे आणि अशा स्थळांवर लावण्यात येणाऱ्या झाडांसाठी पाण्याची आणि संरक्षण व्यवस्था, वृक्ष लागवडीसाठी निधीची व्यवस्था, याबाबत वरिष्ठ अधिका-यांनी पाहणी करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन द्यावे.

५. संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र क्र.२ मध्ये आवश्यक ती माहिती भरुन दि.३०/११/२०१७ पर्यंत शासनास सादर करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१७१२०८१३३८५०४९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

P. M Takate

Digitally signed by P. M Takate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cbc81d3569a4d80b2e2d776cce4c4a214d2dfe787783854814b3a4fa7c83b18b, cn=P. M Takate
Date: 2017.12.08 13:44:41 +05'30'

(पा.म.ताकटे)
उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

प्रत:-

१) अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,

२) सहसचिव (विद्यापीठ शिक्षण / तंत्र शिक्षण / कला),उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण / ग्रंथालये), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२,

३) कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / महाविद्यालय प्रमुख यांना शासन परिपत्रकाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

४) संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण /कला /ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / महाविद्यालय प्रमुख यांना शासन परिपत्रकाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

५) निवडनस्ती / आस्था-२.